दैनिक महाराष्ट्र जीत
रविवार दिनांक 15 जून 2025


## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त कृ,उ,बा,स. परिसरात वृक्षारोपण

**मालेगाव / सुरज अवचार :-** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने "एक वृक्ष आईच्या नावाने" या भावनिक आणि प्रेरणादायी उपक्रमांतर्गत शुक्रवारी स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आमदार अमित झनक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती ॲड. संतोष पोफळे, उपसभापती संदिप घुगे, संचालक रवि भुतडा, उद्धव गोडे, उल्हासराव घुगे, भूषण खाडे, दादाराव आदमने, राजू गिद, सुरेश शिंदे, डॉ.निलेश मानधने तसेच व्यापारी महेश जाजु, मुरलीधर परताणी, दशरथ वानखेडे, किशोर काबरा, विजय अडिचवाल, कृष्णा अहिर, विठ्ठल बोरचाटे यांसह इतर मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते. या वृक्षारोपण उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच सहकार तत्वांनुसार सामाजिक बांधिलकी जपणे हा होता. उपस्थितांनी आपल्या मतांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून उपक्रमाला एक भावनिक अधिष्ठान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी वक्त्यांनी सहकार भावना बळकट करण्याबरोबरच पर्यावरण रक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्याचे आवाहन केले.



## हवामान अभ्यासक गोपाल गावंडे यांच्या अंदाजाप्रमाणे, विदर्भात दमदार पाऊस अपेक्षीत.

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**
मानोरा तालुक्यातील ग्राम रुई (गोस्ता) येथील जिल्ह्याचे एकमेव हवामान अभ्यासक गोपाल विश्वनाथ गावंडे यांचे दरवर्षीच पावसाचे अनुमान व तारखा दोन ते तिन महिने पूर्वीच घोषीत करीत असतात. पर्यावरणाच्या अभ्यासाअंती त्यांचे येणारे 'हवामान-अंदाज' असतातआज रोजी त्यांच्या अंदाजावर अवलंबून महाराष्ट्रातील शेकडो शेतकरी आपल्या शेत पिकाचे आणि शेतमालाच्या रक्षणाचे नियोजन करीत असतात.काही महिन्यापूर्वीच त्यांनी यावर्षी चांगला पाऊस होणार असून शेतीचे उत्पन्नही सरासरी पेक्षा जास्त होण्याची शक्यता वर्तवली होती. तसेच जूनच्या दि. १२ जून पासून पावसाला सुरुवात होणार असल्याचे सांगतानाच दि. १२ ते १७ जूनपर्यंत दररोज राज्याच्या काही जिल्ह्यात,भाग बदलवून विजेच्या कडकडाटासह वादळी पाऊस होणार असून,अनेक ठिकाणी विजा पडणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांना सतर्क केले होते. आधीच्या दिवसात रिमझिम पावसाला सुरुवात होईल नंतर पावसाचे प्रमाण वाढत असल्याचे सांगतानाच जून महिन्यात पाऊस कमी होणार असून,जुलै महिन्यात मात्र सर्वदूर चांगला पाऊस होणार असल्याचे त्यांनी सांगीतले .त्यांच्या अंदाजाप्रमाणे दि.१२ जून पासून पावसाला प्रारंभ झाला असून राज्याच्या अनेक भागासह विदर्भ,वाशिम, अकोला,अमरावती,यवतमाळ, बुलडाणा जिल्ह्यातही वारे वादळासह दि १२ जून रोजी पाऊस झालेला आहे. या संदर्भात भ्रमणध्वनीवरून बोलतांना त्यांनी सांगीतले की, "तुर्तास पावसाचा लहरीपणा दिसून येईल.कोठे प्रखर ऊन,उष्णताआणि उघाड तर कोठे जोरदार वाऱ्यासह वादळी पाऊस अनुभवायला मिळणार आहे.दि. १२ ते १७ जून पर्यंत महाराष्ट्र राज्याच्या सर्वच प्रांतात आणि जिल्ह्यात दुपारनंतर पाऊस होईल.



त्यांच्या म्हणण्या प्रमाणे,दि.१२ ते १७ व पुढे दि.२०, २२,२३,२९ या तारखांना पाऊस होईल. विशेष म्हणजे या तारखांना मुसळधार पाऊस होण्याची शक्यता ग्राह्य धरून हवामान विभागानेही पालघर ठाणे मुंबई पुणे धुळे जळगाव नाशिक सातारा, लातूर वाशिम अमरावती यवतमाळ भंडारा चंद्रपूर वर्धा जिल्ह्यासाठी यलो अलर्टचा इशारा दिला आहे. दरम्यान सद्यस्थितीत अरबी समुद्रा पासून महाराष्ट्रभर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने मान्सूनचे वारे वेगाने विदर्भात दाखल होऊन या वादळी पावसामध्येच मान्सूनला गती मिळणार आहे. राज्यात काही ठिकाणी साधारणतः भाग बदलवीत जरी पाऊस पडेल . दि.१७ नंतर पूर्व विदर्भ, पश्चिम विदर्भ,खान्देश,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्रासह अकोला-वाशिम जिल्ह्यातही पेरणीजोगा पाऊस होऊन,जूनच्या उत्तरार्धात पेरण्यांना सुरुवात होईल.शेतकरी व ग्रामस्थांनी आपल्या शेतात काम करत असतांना हवामान विभागाने दिलेल्या यलो अलर्ट मुळे सतर्क होऊन सायंकाळ पूर्वीच शेतातून घराकडे परत यावे. नदी,नाले,पांदण रस्ते पुरामुळे वहात असतांना कोणीही पुरामधून रस्ता ओलांडू नये. विजा पडणार असल्याने जास्तीत जास्त सतर्क व्हावे. हिरव्या झाडाखाली थांबू नये. गुराढोरांना झाडाखाली बसवू नये. विजेच्या कडकटात पाऊस होत असल्यास मोबाईल फोन बंद ठेवावेत.एकदा भरपूर प्रमाणात चांगला पाऊस झाल्याशिवाय पेरण्या करू नये. असे आवाहन गोपाल पाटील गावंडे यांनी केले आहे.

## दिपक शहाणे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**देगलूर/प्रतिनिधी संघपाल मदने**
सामाजिक भान आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत देगलूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते दिपक शहाणे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून शमशानभूमीत वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबवला. हा अभिनव उपक्रम एकनाथ टेकाळे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. पारंपरिक केक कापण्याऐवजी वृक्षारोपणाचा मार्ग स्वीकारत त्यांनी पर्यावरण रक्षणाचा सकारात्मक संदेश दिला. विशेष म्हणजे, खासदार अशोक चव्हाण यांचे विश्वासू म्हणून ओळख असलेल्या दिपक शहाणे यांनी शमशानभूमीसारख्या ठिकाणी वृक्षारोपण करत सामाजिक सजगतेचे उदाहरण घालून दिले आहे. या उपक्रमावेळी संपादक गजानन टेकाळे, पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख असलम, कार्याध्यक्ष धनाजी देशमुख, स्वच्छतेचा जागर ग्रुपचे सुर्यकांत स्वर्णकार, सत्यनारायण नागोरी यांच्यासह आदी उपस्थित होते.. वाढदिवस साजरा करण्याचा असा पर्यावरणपूरक मार्ग समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे.



## बच्चूभाऊ कडू यांचे शेतकरी कर्ज माफी व अन्य मागण्याकरीता सुरू असलेल्या आंदोलन ॲड ज्ञायक पाटणी याचे समर्थन

### गुरुकुंज मोझरी येथील उपोषण स्थळी अनेक कार्यकर्त्यासह अड पाटणी पोहचले

**कारंजा:-** दिनांक 14जुन 2025 रोजी युवा नेते अड ज्ञायक पाटणी यांनी अनेक कार्यकर्त्यांसह बच्चूभाऊ कडु यांची उपोषण स्थळी भेट घेऊन आपले समर्थन दिले त्यांच्यासी चर्चा केली,संवाद साधला. शेतकऱ्यांच्या कर्ज माफी सह विविध मागण्यासाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष, माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांनी गुरुकुंज मोझरी येथे अन्न त्याग आंदोलन सुरू केले होते. भाजप सत्तारूढ पक्षाने कर्ज माफीचे आश्वासन निवडणुकीत दिले होते. त्याचा विसर सरकाराला पडला. राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला. त्याचे शेतमालास पाहिजे तसा भाव न मिळाल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत आला. असे असताना सुद्धा शेतकऱ्यास त्याच्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी आंदोलन करावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांप्रती सरकार संवेदनशील नसल्याचा शेतकऱ्यांना ,शेतकरी नेत्यांना आंदोलन करावी लागत आहे असा सूर जनतेत उमटला असुन बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनास शेतकऱ्यांनी प्रतिसाद देण्यास सुरुवात केली आणि या आंदोलनाच्या प्रतिक्रिया शेतकऱ्याकडून उमटायला सुरुवात झाली. यावेळी शेतकऱ्यांच्या व गोर गरिबांच्या प्रश्नाला नेहमीच प्राधान्यक्रम देणारे युवा नेते अड ज्ञायक पाटणी यांनी शेतकऱ्यांच्या महत्वाच्या कर्जमाफीच्या व अन्य विविध मागण्यासाठी उपोषण करीत असलेल्या बच्चूभाऊ कडु यांची भेट घेतली व त्यांना आपला पाठिंबा दिला. अड ज्ञायक पाटणी ,ठाकुरसिंग चव्हाण, श्रीधर पाटील कानकिरड ,तांडा सुधार अधक्ष प्रकाश राठोड, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ज्योतीताई गणेशपुरे, ललितजी चांडक ,विजय अनंतकुमार पाटील, निळकंठ पाटील, अनिल नाईक उपसरपंच,मनोज कानकिरड, राजूभाऊ अवताडे, नितीन गाडगे,गजानन भाऊ राऊत, संकेत नाखले,श्री. श्याम राठोड, माजी सरपंच गणेश घोरसडे, सुरेश जाधव, श्रावण मेटकर ,गणेश खंडारे ,गौरव जाधव , विजय चव्हाण ,महेश राठोड़,श्रीकृष्ण मुंदे,मंगेश धाने, दिनेश वाडेकर, शुभम बोनके ,संतोष गुल्हाने, मनोज रसाळे शशी वेळुकर, अजय जाधव, धीरज वावगे आदीसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



## जागतिक रक्तदान दिवस रक्ताविना नाही रे प्राण..!

**-शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि. यवतमाळ**
**मो:९१३०८३५४५८**

आज जागतिक 'रक्तदान' दिवस. संपूर्ण जगभरातील रक्तदात्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. २००४ पासून जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ )वतीने संपूर्ण जगभरात १४ जून हा दिवस 'रक्तदान दिन' म्हणून साजरा केला जातो. ए- बी -ओ या गटांचा शोध लावणारे आणि रक्तदात्यांच्या संकल्पनेला व्यापक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे नोबल विजेते डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान दिन आयोजिला जातो. भारतीय संस्कृतीत दानाला अनन्य साधारण महत्त्व आहे. चरकांच्या शास्त्राप्रमाणे एखाद्याला जीवनदान देणे हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. रक्तदान म्हणजेच जीवनदान यात दुमत नाही. भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असून ही रक्तदानात मात्र खूप मागे पडला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) म्हणण्यानुसार देशाला प्रतिवर्षी एक कोटी युनिट रक्ताची आवश्यकता असते. परंतु केवळ पंच्याहत्तर लाख युनिट्स उपलब्ध होतात. लोकसंख्येच्या तुलनेत ही फार मोठी उणीव आहे. रक्तदान ही एक निरोगी आणि सकारात्मक पद्धती आहे. निरोगी नागरिक हे देशाची अनमोल संपत्ती आहे आणि ही टिकवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. रक्तदान ही अविरत चालणारी सामाजिक चळवळ आहे. तिचा थेट संबंध प्राणदानाशी आहे. रक्तासंबंधित अनेक आजारावर मात करण्यासाठी दैनंदिन जीवनात रक्ताची मोठी गरज भासते. मोठ्या संख्येत रक्ताची गरज असणाऱ्या आजारांमध्ये थॅलेसिमिया, रक्त कर्करोग, अप्लास्टिक अनिमियाचे रुग्ण, रक्तस्त्राव . रक्तविकार असलेले रुग्ण. दीर्घ शस्त्रक्रिया, गर्भवती महिला, शिवाय अपघातग्रस्तांना रक्ताची प्रामुख्याने गरज भासते. तसेच विविध रक्तविकारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना त्यांच्या शरीरात रोगप्रतिकारशक्ती निर्माण होण्याच्या हेतूने सतत रक्त संक्रमणाची गरजही असते. ही गरज भागविण्यासाठी रक्तदानाशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. रक्तदान करणे हे संपूर्ण ऐच्छिक असून मानवतावादी उदात्त कार्य आहे. जर आपल्याला आपल्याच परिसरातील एखाद्या व्यक्तीला रक्ताची उणीव भासत असेल तर त्या रुग्णाकरिता रक्त रक्तदानासाठी निः संकोचपणे समोर यायला हवे. तसेच त्याच्या निरोगी आरोग्यासाठी योगदान देणे आपले कर्तव्य मानले पाहिजे. रक्तदान हे उदात्त कार्य आहे जे केवळ रक्तदात्याच नव्हेतर रुग्णाला देखील मदत करते. म्हणजेच रक्तदान ही डबल बेनिफिट कृती आहे.प्रत्येक रक्तदात्यानी रक्तदानाकडे आरोग्य सुधारण्याचा एक सुलभ पुण्यमार्ग मानला पाहिजे. प्रत्येक एका रक्तदानामुळे दात्याचे अंदाजे ६००ते ६५० कॅलरीज बर्न होतात. कारण आपले शरीर दान केलेल्या रक्ताची जागा घेण्याची काम करते. रक्तदान केल्यानंतर ४८ तासाच्या आत दात्यांच्या शरीरात नवीन लाल रक्तपेशी तयार करण्यास सुरुवात होत असते. त्यामुळे चैतन्य राखण्यास सहाय्यकारी ठरते. मानवाला शारीरिक फायद्याच्या व्यतिरिक्त रक्तदान हे वैद्यकीय परिस्थितीसाठी एक प्रभावी उपचारांचा पर्याय सुद्धा बनला आहे. संशोधनानुसार असे सांगितले जाते की, रक्तदात्याचे मानसिक आणि भावनिक आरोग्यात सुधारणा सुद्धा होते. सातत्याने रक्तदान करणारे समाजामध्ये मानवतावादी मजबूत संबंध निर्माण करतात. तसेच रक्तदाता प्रत्येकासाठी आरोग्य सेवेला समर्थन देणाऱ्या, काळजी घेणाऱ्या यंत्रणेचा भाग ही बनतो. ही सवय इतरांसाठी जीवन रक्षक आहे. आज रक्तदानाविषयी समाजात प्रचंड गैरसमज आणि नकारात्मक दृष्टिकोन आहे .तो दूर करण्यासाठी सातत्याने विशेष प्रयत्न व्हायला पाहिजे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात, शहरात लोकसंख्येच्या घनतेनुसार रक्त संकलन केंद्रे उभी होणे काळाची गरज बनली आहे. रक्त हे विनामूल्य उपलब्ध आहे. रक्तांची विक्री व काळाबाजार थांबवण्यासाठी रक्तांची उपलब्धी स्थळ, काळानुरूप होणे अत्यंत गरजेचे ठरते.आजच्या रक्तदान दिवसाकडे रक्तदात्याप्रति कृतज्ञ होणेच मर्यादित नसून रक्ताची कमतरता होऊ नये.याकडेही गांभीर्याने लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते.

**लेखक शशिकांत तोटे**
**दारव्हा,जिल्हा यवतमाळ**

## प्रदिप पट्टेबहादूर व आकांक्षा गायकवाड यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांचे हस्ते सत्कार.





वाशीम(प्रतिनिधी)डॉ बाबासाहेब आंबेडकर जि.प.मागासवर्गीय कर्मचारी सह.पतसंस्था मर्या. अकोला/वाशीम या संस्थेच्या अंतर्गत वाशीम येथे दि.१३ जून रोजी दुपारी २:०० डॉ बाबासाहेब आंबेडकर जि.प.मागासवर्गीय कर्मचारी सह.पतसंस्थेचे शाखेचे उद्घाटन सुभारंभ सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे शाखेचे उद्घाटन वाशीम जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांचे हस्ते फीत कापून करण्यात आले.याच कार्यक्रमामध्ये प्रदिप पट्टेबहादूर व आकांक्षा गायकवाड यांनी नेहरू युवा केंद्र व एन.एस.एस.च्या माध्यमातून शिक्षण , आरोग्य, रोजगार स्वच्छता अशा विविध विषय घेऊन काम केले आहे.आणि त्याचीच दखल म्हणून राळेगणसिद्धी येथे थोर समाजसेवक अण्णा हजारे व बीजमाता राईबाई पोपेरे यांचे हस्ते प्रदिप पट्टेबहादूर व आकांक्षा गायकवाड यांना सन्मानित केले आहे.त्यामुळे त्यांनी वाशीम जिल्ह्यांचा सन्मान वाढविला आहे. म्हणून जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आहे.यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त जेष्ठ नेते गोपाळराव आटोटे, अकोला पतसंस्था अध्यक्ष प्रशांत सिरसाठ, शिक्षणाधिकारी प्राथमिक विठ्ठलराव भुसारे, दौलतराव हिवराळे, बबनराव खिल्लारे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, गटविकास अधिकारी रविंद्र सोनोने, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त अरविंद पडघन, समाज भूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर, माधव डोंगरदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्थेचे संचालक हेमंत तायडे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक विनोद राजगुरू यांनी केले.

## कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर

**पनवेल (प्रतिनिधी)**
भारतीय जनता पार्टीचे कळंबोली मंडल अध्यक्ष तसेच पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर अरुण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दिनांक १६ जून रोजी कळंबोलीत मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सिटी हॉस्पिटल, आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व सुश्रुत हॉस्पिटल यांचा सहभाग आहे. या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



कळंबोलीतील सेक्टर ०३ मधील सिटी हॉस्पिटल येथील रुग्णालयात जनरल चेकअप, कान, नाक, घसा, डोळे व दंतरोग तपासणी, सेक्टर १६ मधील आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जनरल चेकअप, कान, नाक, घसा, रक्तदाब, रक्त तपासणी, तसेच गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी, तर सुश्रुत हॉस्पिटल येथे जनरल चेकअप, कान, नाक, घसा, आणि हाडांची तपासणी आदी तपासण्या करण्याबरोबरच औषधे मोफत दिली जाणार आहेत. या उपक्रमाचा कळंबोली व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कळंबोली भाजप मंडळाच्यावतीने करण्यात आले

## १५ जून : जागतिक ज्येष्ठ नागरिक अत्याचार जागरूकता दिन

**डॉ. भारत कऱ्हाड**
जगभरात १५ जून रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक अत्याचार जागरूकता दिन' साजरा केला जातो. वृद्धांवरील अन्याय, उपेक्षा आणि शोषणाविरोधात जनजागृती घडवण्यासाठी आणि सरकार, संस्थांना प्रभावी हस्तक्षेपासाठी प्रेरित करण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरतो. २००६ मध्ये 'INPEA' या संस्थेने सुरू केलेल्या या उपक्रमाला २०११ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने अधिकृत मान्यता दिली. २०२५ मध्ये हा दिवस "दीर्घकालीन काळजी सुविधांमधील वृद्ध अत्याचारावर मात" या संकल्पनेच्या अधीन साजरा होत आहे. वृद्धांवरील अत्याचार ही आता सार्वजनिक आरोग्याची आणि मानवी हक्कांची एक गंभीर समस्या बनली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माहितीनुसार, वृद्ध व्यक्तींविषयी कोणत्याही विश्वासाच्या नात्यात वारंवार होणारी हानीकारक वागणूक किंवा उपेक्षा, जिचा त्याच्या शारीरिक, मानसिक किंवा भावनिक आरोग्यावर परिणाम होतो, ती अत्याचाराच्या व्याख्येत येते. यात शारीरिक, मानसिक, आर्थिक, लैंगिक अत्याचारासोबतच दुर्लक्षही समाविष्ट असते. दुर्दैवाने, ही समस्या अनेक समाजात अद्याप 'न बोलली जाणारी' बाब आहे आणि तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. नवीनतम आकडेवारीनुसार, जगातील सुमारे १६.७% वृद्ध दरवर्षी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अत्याचाराला सामोरे जातात. विशेष म्हणजे, वृद्धांवरील अत्याचाराच्या फक्त २४ पैकी १ प्रकरण अधिकृतपणे नोंदवले जाते. वृद्ध व्यक्ती अनेकदा आपल्या नातलगांकडून किंवा परिचितांकडून होणाऱ्या शोषणाबाबत बोलण्यास घाबरतात. त्यामुळे वास्तविक घटनांची संख्या अधिक असल्याचे संशोधक मानतात. विविध प्रकारच्या अत्याचाराचा प्रसार दर असा दिसून येतो: मानसिक अत्याचार – ११.६%, आर्थिक शोषण – ६.८%, दुर्लक्ष – ४.२%, शारीरिक अत्याचार – २.६% आणि लैंगिक शोषण – ०.९%. हे सर्व प्रकार वृद्धांच्या आरोग्यावर, आत्मसन्मानावर आणि सामाजिक सहभागावर दीर्घकालीन परिणाम घडवतात. वृद्ध लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्यामुळे ही समस्या अधिक व्यापक स्वरूपात समोर येत आहे. २०१५ मध्ये ९० कोटी असलेली ६० वर्षांवरील लोकसंख्या २०५० पर्यंत २ अब्जांवर पोहोचणार आहे, आणि त्यापैकी ८०% लोक कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये राहतील. जर अत्याचाराची सध्याची टक्केवारी स्थिर राहिली, तर २०५० पर्यंत ३२ कोटी वृद्ध अत्याचाराचे बळी ठरू शकतात. देशनिहाय विश्लेषण करताना काही चिंताजनक उदाहरणे पुढे येतात. ऑस्ट्रेलियामधील न्यू साउथ वेल्समध्ये वृद्ध अत्याचाराच्या अर्ध्याहून अधिक घटना वृद्धांच्या स्वतःच्या मुलांकडून घडतात. क्वीन्सलँडमध्ये २०२४-२५ या कालावधीत हेल्पलाईनवर ४४५८ कॉल्स आले – हा आतापर्यंतचा उच्चांक. अमेरिका (कनेक्टिकट) मध्ये दरवर्षी ६० वर्षांवरील व्यक्तींमध्ये १० पैकी १ अत्याचाराच्या बळी पडतो, तर मिशिगनमध्ये दीर्घकालीन काळजी केंद्रात वर्षभरात ९४,००० पेक्षा जास्त उल्लंघन नोंदवले गेले, ज्यापैकी ८.१% अत्याचाराशी संबंधित होती. भारतामध्येही परिस्थिती वेगळी नाही. HelpAge India ने केलेल्या ताज्या सर्वेक्षणात असे दिसून आले की, वृद्ध लोक डिजिटल युगात सहभागी होण्यास उत्सुक आहेत; ७३% लोकांनी डिजिटल संवादामुळे समाधान असल्याचे सांगितले. मात्र, अनेक वृद्ध डिजिटल फसवणूक, भ्रमित तंत्रज्ञान आणि सायबर शोषणाला सामोरे जात आहेत. विशेषतः कोविडनंतरच्या काळात वृद्ध लोक अधिक एकटे पडले आहेत, ज्यामुळे भावनिक व मानसिक समस्यांचा उद्रेक झाला आहे. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी संयुक्त राष्ट्रे, WHO आणि विविध आंतरराष्ट्रीय संघटनांनी संयुक्तपणे 'Decade of Healthy Ageing 2021–2030' या उपक्रमांतर्गत रणनीती ठरवल्या आहेत. यात वृद्धांविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, हस्तक्षेपांची माहिती संकलित करणे, प्रभावी कार्यक्रम राबविणे, आणि पुरेसा निधी उपलब्ध करणे या बाबींचा समावेश आहे. Intervention Accelerator या नव्या उपक्रमाअंतर्गत सध्या ८९ प्रभावी उपायांची यादी उपलब्ध करण्यात आली आहे. भारतासारख्या देशात कायदेशीर आणि सामाजिक दोन्ही उपायांची गरज आहे. सशक्त कायदे, वृद्ध व्यक्तींना न्याय मिळवून देणाऱ्या संस्थांचे सक्षमीकरण, डिजिटल साक्षरता वाढविणे, हेल्पलाईन्स आणि सुरक्षित निवाससुविधा यांची आवश्यकता आहे. आज जेव्हा आपण वृद्धांची वाढती लोकसंख्या, त्यांचे वाढते आरोग्यविषयक प्रश्न आणि एकटेपणा पाहतो, तेव्हा 'जागतिक ज्येष्ठ नागरिक अत्याचार जागरूकता दिन' केवळ प्रतीकात्मक राहू नये, तर तो समाजपरिवर्तनाचा खरा प्रारंभ ठरावा. वृद्ध व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणे ही केवळ सरकारांची नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. वृद्धांना सन्मान, सुरक्षितता आणि सहभागाची हमी मिळाल्यासच समाज खरोखर प्रगत म्हणवू शकतो. त्यामुळे वृद्धांविषयी असलेल्या पूर्वग्रहांना बाजूला सारून, त्यांच्याविषयी आदरभाव व सहकार्याने जगणे हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## रामेश्वर एखंडे पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटात जाहीर पक्ष प्रवेश

**बुलढाणा जिल्हा उमेश एखंडे**
मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांचे चिरंजीव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते श्री रामेश्वर एखंडे पाटील यांनी आज सिनखेडराजाचे आमदार मनोज भाऊ कायंदे जिल्हाध्यक्ष अड नाझेर काझी साहेब त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये शेकडो कार्यकर्त्यास सोबत जाहीर प्रवेश केला श्री रामेश्वर एखंडे पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे मतदार संघात वेगळं वातावरण निर्माण झालेले येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट आघाडीवर असेल व आघाडीवर घेऊन जाऊ गाव तिथे शाखा घर तिथे कार्यकर्ता असे वादळ सिंदखेडराजांमध्ये तयार करू राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचे स्वप्न साकार करू आणि आजपासून पूर्ण तयारी लागलो आहे येणाऱ्या काळामध्ये अजित दादा पवार यांचे विचार करावा पर्यंत पोहोचण्यासाठी चांगले काम करून सर्व तरुण युवकांना सोबत घेऊन मतदार संघामध्ये संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार आहोत आगामी काळात होऊ घातलेल्या नगरपालिका ग्रामपंचायती जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट मतदार संघात एक नंबरचा पक्ष ठरेल ग्रामीण भागामध्ये गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही तयार राहू रामेश्वर एखंडे पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे पक्षाला नक्की पक्ष वाढीसाठी मदत होईल आणि त्यांचा आमच्या पक्षांमध्ये स्वागत आहे कसे आमदार मनोज



कायदे व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट नजर काजी साहेब यांनी यावेळी सांगितले श्री रामेश्वर एखंडे पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटात जाहीर पक्ष प्रवेश केला